| | | | |
|---|---|---|---|
| MHNG110005532018 | दाखल तारीख | : | १७.०७.२०१८ |
| | नोंदणी तारीख | : | १७.०७.२०१८ |
| | निकाल तारीख | : | २४.०७.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | ०८ ०० ०८ |
| | निशाणी | | **२७** |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कुही, जिल्हा नागपूर यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी पी. के. मुटकुळे)

**सं.फौ.ख.क्र.२९७/२०१८**

प्रथम खबर क्र.११४/२०१८, पोलीस ठाणे कुही.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे, कुही,<br>ता. कुही, जि.नागपूर. |
| सरकारी अभियोक्ता | श्रीमती व्ही.ए.फुले |
| आरोपी | भैरुलाल छितरजी कुमार,<br>वय – २८ वर्षे, रा. रामपाली,<br>ता. सरवाड, जि. अजमेर<br>(राजस्थान) |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. डी. एस. बन्सोड |
| घटना तारीख | २३.०३.२०१८ |
| प्रथम खबर तारीख | २३.०३.२०१८ |

| | |
|---|---|
| दोषारोप दाखल तारीख | १७.०७.२०१८ |
| आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित तारीख | १०.०७.२०१९ |
| पुरावा चालु तारीख | २२.०८.२०२४ |
| न्यायनिवाडा राखुन ठेवलेली तारीख | नाही |
| न्यायनिवाडा तारीख | २४.०७.२०२६ |

## आरोपीची सविस्तर माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतीम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भैरुलाल छितरजी कुमार | २४.०३.२०१८ | २४.०३.२०१८ | भादवि कलम २७९, ३३७, ३३८ व मो. वा. का. कलम १८४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

### अ. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | अविनाश रामभाऊ राऊत नि.१२ | साक्षीदार |
| सा.क्र.०२ | घनश्याम ईश्वर राऊत नि.१४ | तक्रारदार |
| सा.क्र.०३ | पराग कृष्णराव मोहीते नि.१८ | पंच साक्षीदार |

### ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**अभियोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे व न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले कागदपत्र**

**ड. अभियोगपक्षातर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | नि.क्र.१५ व १६/सा.क्र.०२ | तक्रार, घटनेचा प्राथमिक अहवाल |
| ०२ | नि.क्र.१९ व २०/सा.क्र.०३ | सुचनापत्र व पंचनामावरील स्वाक्षरी |

**इ. आरोपीतर्फे –**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | नाही | नाही |

**फ. न्यायालयातर्फे –**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | नाही | नाही |

## न्या य नि र्ण य

(दिनांक २४/०७/२०२६ रोजी घोषीत)

०१ प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० कलम २७९, ३३७, ३३८, सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा केल्याच्या दोषारोपासाठी चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –

०२. घनश्याम ईश्वर राऊत (यापुढे 'तक्रारदार' संबोधण्यात येते) याने दिनांक २३.०३.२०१८ रोजी पोलीस ठाणे कुही येथे अशा आशयाची तक्रार दिली होती की, दि.२३.०३.२०१८ रोजी दुपारी ०२.०० ते ०२.३० वाजताच्या सुमारास कैलास वाढवे हा मोटार सायकल क्र. एम.एच.४०/सी.८१५९ ने खलासना गावाकडे जात असताना उमरेडकडून नागपूरकडे जाणाऱ्या चौदा चक्का ट्रेलर क्रमांक आर.जे.–०१/जी.ए.–६७१६ ने मौजा पिपरी फाटा रिलायन्स पेट्रोल पंपजवळ त्याच्या मोटार सायकला धडक मारुन गंभीर जखमी केले.

०३. सदर तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, कुही येथे गुन्हा क्रमांक ११४/२०१८ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपासीक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, वैद्यकीय कागपत्र हस्तगत केले व गाडीचे कागदपत्र हस्तगत केले. आरोपीला अटक केली व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपीविरुध्द निशाणी क्र.०९ वर दोषारोप निश्चित केले. त्यातील मजकुर आरोपीला समजून सांगीतला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे नमुद करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. खटला संक्षिप्त पध्दतीने चालविण्याचे अधिकार नसल्यामुळे व पुरावा दिर्घ नोंदविलेला असल्याने प्रस्तुत खटला वॉरंट खटला पध्दतीने चालविण्यात आला.

०५. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने वर नमूद एकूण ०३ साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

०६. आरोपीविरुध्द दोषपूर्ण कथन पटलावर आले नसल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०७. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.ए. फुले व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी. एस. बन्सोड यांचा युक्तीवाद ऐकला.

०८. अभिलेखावरील पुरावा व युक्तीवाद यावरुन माझेसमक्ष पुढील मुद्दे उपस्थीत होतात. त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रेलर क्र. आर.जे.०१/जी.ए.-६७१६ हा मानवी जिवित्वास धोका हाईल अशा रितीने निष्काळजीपणे व हयगईने चालविला ? | नाही.. |
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमूद वाहन निष्काळजीपणे व हयगईने चालवुन कैलास वाढवे चालवीत असलेल्या मोटार सायकलला धडक देऊन तो त्याच्या किरकोळ दुखापतीस कारणीभूत ठरला? | नाही.. |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमूद वाहन निष्काळजीपणे व हयगईने चालवुन कैलास वाढवे चालवीत असलेल्या मोटार सायकलला धडक देऊन तो त्याच्या जबर दुखापतीस कारणीभूत ठरला? | नाही.. |
| ४. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन त्याच्या ताब्यातील वाहन चालविले ? | नाही.. |
| ५. | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ ते ०४ करीता –**

०९. सदर मुद्दे एकसारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने विनासंशय असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रेलर क्र. आर.जे.०१/जी.ए.–६७१६ निष्काळजीपणे चालवून मानवी जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले व तो कैलास वाढवे यास झालेल्या किरकोळ आणि जबर दुखापतीस कारणीभूत ठरला. सदर बाबी सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने वर नमुद साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

१०. घनश्याम सा.क्र.०२ हा तक्रारदार असुन त्याने त्याच्या साक्षीत असे नमुद केले की, तो जखमी कैलास याला ओळखतो. जखमी तक्रारदाराच्या ट्रकवर लेबरचे काम करत होता. नमूद घटना सन २०१८ मध्ये घडली होती. त्यावेळी त्याला माहीत झाले की, कैलास वाढवे याचा दुपारी ०३.०० वाजताच्या दरम्यान पिपरी खलासना फाटा, नागपूर उमरेड रोडवर अपघात झाला आहे. त्यामुळे त्याने पाचगाव चौकीमध्ये तोंडी रिपोर्ट नि.क्र. १५ दिली. उलटतपासादरम्यान त्याने असे कथन केले की, घटना त्याच्या समक्ष घडली नाही. त्याने अशी कबुली दिली की, तो जेव्हा पोलीस चौकीत गेला त्यावेळी पोलिसांनी त्याच्या फक्त सह्या घेतल्या.

११. अविनाश सा.क्र.०१ हा साक्षीदार असुन त्याने त्याच्या साक्षीत असे नमुद केले की, तो जखमी कैलास वाढवे याला ओळखतो. घटना दि. २३.०३.२०१८ दुपारी ०२.०० ते ०२.३० वाजता नागपूर उमरेड रोडवर रिलायंन्स पेट्रोल पंप समोर पिपरी फाटा येथे घडली होती. तेथे ट्रेलरने कैलास वाढवे याचा अपघात झाला होता. घटनेच्यावेळी तो गावाला होता. त्याला प्रमोद राऊत याने फोन करुन अपघाताबद्दल माहिती दिली होती. त्यानंतर तो घटनास्थळी गेला असता कैलास वाढवे याच्या डोक्याला, हाताला व पायाला मार लागल्याचे त्याने पाहिले होते. सदर साक्षीदाराची साक्ष पाहता तो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसून ऐकीव स्वरुपाचा साक्षीदार आहे. त्याच्या पुराव्यातून असे स्पष्ट होते की, त्याने घटना प्रत्यक्ष पाहिली नाही.

१२. पराग सा.क्र.०३ घटनास्थळ पचं साक्षीदार आहे. परंतु त्याने अभियोगपक्षाच्या कथनाला समर्थन दिले नाही. पोलिसांनी त्याच्यासमक्ष कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे त्याने कथन केले.

१३. पटलावरील पुराव्यावरुन असे दिसुन येते की, तक्रारदार व साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. घटनास्थळ पंच याने अभियोगपक्षाला समर्थन दिले नाही. घटनेतील जखमी कैलास वाढवे याच्या मोटार सायकलला धडक दिलेला ट्रेलर आरोपी चालवीत होता याबाबत कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही. परिणामी आरोपीने अपघातातील ट्रेलर निष्काजीपणे चालवून कैलास वाढवे याच्या मोटार सायकलला धडक दिला व त्याच्या किरकोळ व जबर दुखापतीस कारणीभूत ठरला इत्यादी बाबी सबळ पुराव्याअभावी सिध्द होत नाही. सबब मी, मुद्दा क्र.०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र.०५ करीता –**

१४. मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ चे निष्कर्षावरुन अभियोगपक्ष आरोपीवरील दोषारोप सबळ पुराव्याअभावी सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे आरोपीची प्रस्तुत प्रकरणातील दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत आहे. सबब, मुद्दा क्र.०५ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. आरोपी भैरुलाल छितरजी कुमार याची भारतीय दंड विधान, १८६० कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ या कलमांखालील गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रकिया संहीता कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.५०,०००/– चा जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

PARASRAM KUNDLIK MUTKULE
Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.07.24 17:06:46 +0530

**(पी. के. मुटकुळे)**

दिनांक – २४/०७/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
कुही, जि.नागपूर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. के. सी. मांडवगडे.
न्यायालयाचे नांव – दिवाणी व फौजदारी न्यायालय, क.स्तर, कुही.